# उपक्रम आणि कार्यशाळा

फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) हे प्राध्यापकांना अधिक प्रभावी आणि आधुनिक शिक्षण पद्धतीची जोड देऊन नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याकरिता तसेच त्यांचा विद्यार्थ्यांवर होणाऱ्या सकारात्मक परिणामासाठी हा प्रोग्राम अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रभरातील दौऱ्यादरम्यान सध्याच्या युगात विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यास मदत करण्यासाठी अनुकूल आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींची आवश्यकता आहे ही बाब लक्षात घेता महाराष्ट्रभर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता चालू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रम अंतर्गत महाराष्ट्रभरातील प्राध्यापक वर्ग यांच्या करिता UGC -Malaviya Mission Teacher Training Centre (UGC -MMTTC) यांच्या सहकार्याने फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) आयोजित करण्यात येत आहेत. फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) चा प्राध्यापक वर्ग यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) मध्ये नक्कीच फायदा होतो. FDP प्राध्यापकांना त्यांच्या ज्ञानास आणि कौशल्यास अधिक सक्षम बनवण्यास मदत करते, तर CAS मध्ये पदोन्नती आणि वेतन वाढ होण्यास मदत होते.

करिअर कट्टा उपक्रम अंतर्गत विविध आयोजित FDP खालीलप्रमाणे............

## आवाजाची कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यामार्फत काही वर्षापासून 'करिअर कट्टा' हा अत्यंत यशस्वी उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या माध्यमातून उत्तमोत्तम संधी विद्यार्थ्यांना मिळवून दिल्या जात आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून 'कोविड काळापासूनच' आपण 'आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा'

या संकल्पनेवर आधारीत करिअर कट्टांतर्गत 'आवाजाची कार्यशाळा' हा उपक्रम FDP च्या स्वरूपात राबविला जातो.

## आर्थिक साक्षरता कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत आर्थिक साक्षरतेविषयी कार्यशाळांचे आयोजन भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (SEBI), नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE), बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (BSE) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM) यांच्या सहकार्याने केले जाते. संपूर्ण महाराष्ट्रभरात ह्या कार्यशाळा अनेक महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जात असतात.

आर्थिक साक्षरता म्हणजे व्यक्तींना त्यांच्या आर्थिक निर्णयांबाबत योग्य माहिती व समज देणे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याच्या काळातच योग्य आर्थिक ज्ञान दिल्यास ते भविष्यात आर्थिकदृष्ट्या सुदृढ बनू शकतात. कर्मचाऱ्यांसाठी अशा कार्यशाळा त्यांच्या उत्पन्नाचे योग्य नियोजन, गुंतवणूक, कर नियोजन व निवृत्तीच्या तयारीस मदत करतात.

SEBI, NSE, BSE आणि NISM सारख्या संस्थांकडून प्रमाणित तज्ज्ञ या कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन करतात. यात शेअर बाजाराची माहिती, म्युच्युअल फंड गुंतवणूक, डिजिटल बँकिंग, फसवणुकीपासून संरक्षण यावर भर दिला जातो.

विद्यार्थ्यांना लवकरच आर्थिक शिस्त लागावी, डिजिटल व्यवहारांची माहिती असावी आणि त्यांच्या उद्याच्या आर्थिक निर्णयांमध्ये सजगता यावी, यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरते. कर्मचाऱ्यांसाठीही हाच ज्ञानाचा उपयोग त्यांच्या आर्थिक साक्षरतेत वृद्धी घडवतो.

सरकारी धोरणांनुसारही आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. हे उपक्रम युवकांना आत्मनिर्भर बनवून देशाच्या आर्थिक विकासातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सहभागी सर्व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामधील आर्थिक साक्षरता वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येते. त्यामध्ये सुसूत्रता यावी, उत्कृष्ट पद्धतीचे नियोजन व्हावे यासाठी राज्यस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत आर्थिक साक्षरता कार्यशाळा राबविल्या जातात.

## १) भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence)

उच्च शिक्षणातील प्राध्यापक वर्ग यांच्याकरिता 'भावनिक बुद्धिमत्ता' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) हा प्राध्यापकांच्या भावनिक क्षमता वाढवण्यासाठी डिझाइन केलेला एक उल्लेखनीय उपक्रम आहे, ज्यामुळे अध्यापन आणि वैयक्तिक जीवनात असणाऱ्या भावना यांची सांगड चांगल्या प्रकारे घालण्यास मदत होते. या अंतर्गत स्वतःची जाणीव (Self-awareness), इतरांची भावना समजून घेणे (Empathy), संवाद कौशल्ये (Communication skills), कक्षा व्यवस्थापन (Classroom management), शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे संबंध (Teacher-student relationship) अश्या बऱ्याच घटकांवर सकारात्मक प्रभाव पडतो.

## २) डिझाईन थिंकिंग

शिक्षणात डिझाईन थिंकिंग हा एक शक्तिशाली दृष्टिकोन आहे ज्यामध्ये वाढीव समज, सहानुभूती आणि समस्या सोडवणे, सहयोग आणि नवोपक्रम यावर लक्ष केंद्रित करणारी मानसिकता आणि कार्यपद्धती समाविष्ट आहे. ते आव्हाने ओळखण्यासाठी, माहिती गोळा आणि उपाय तयार करण्यासाठी, कल्पना परिष्कृत करण्यासाठी आणि त्या उपायांची चाचणी करण्यासाठी एक संरचित चौकट देते. डिझाइन थिंकिंग विविध शैक्षणिक संदर्भांमध्ये लवचिकपणे अंमलात आणता येते, क्रियाकलापांसाठी, गट प्रकल्पांसाठी किंवा अगदी अभ्यासक्रम डिझाइनसाठी रोडमॅप म्हणून काम करते.

## ३) ग्रंथपालांकरिता FDP

ग्रंथालय हे विद्येचे माहेरघर असून तिथे शिस्तीचे पालन, ज्ञानग्रहण होणे गरजेचे आहे. जसजसे तंत्रज्ञान विकसित होत आहे त्यानुसार प्रत्येक क्षेत्रात प्रचंड क्रांती घडून येत असून आजच्या विद्यार्थ्याला मोबाईल आणि पुस्तक यामधील समन्वय साधने आव्हानच. त्यामुळे राज्यभरातील सर्व ग्रंथपालांना डिजिटल क्रांतीच्या या युगामध्ये मोबाईल आणि पुस्तक याचा योग्य तो समन्वय साधून विद्यार्थ्यांना योग्य ती दिशा देण्याकरिता ग्रंथपालांकरिता सुद्धा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) चे करिअर कट्टा उपक्रम अंतर्गत आयोजन करण्यात येत आहे.

* वरील तिन्ही निःशुल्क ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणारे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) असून यामध्ये फक्त किरकोळ अशी २०० रुपये परीक्षा रक्कम आकारली जाते.

## ४) मधुमक्षिकापालन / मधुर समन्वय उपक्रम

खादी व ग्रामोद्योग मंडळ महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने राज्यातील १०० हून अधिक महाविद्यालयामध्ये प्रत्येकी ५० मधूमक्षिका पालनासाठीच्या पेट्या असणारे मधकेंद्र मधुर क्रांती अंतर्गत तयार केले जाणार आहे. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सहा दिवसाचा ‘फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम’ घेण्यात येणार असून या माध्यमातून ज्या ठिकाणी मधुमक्षिका पालन या व्यवसायासाठी पोषक वातावरण आहे अशा १०० हून अधिक तालुक्यांमधील महाविद्यालयांची निवड करून आणि प्राध्यापक यांना प्रशिक्षण देऊन, विद्यार्थी रोजगाराभिमुख होण्याकरिता प्रतिवर्षी किमान ३०००० तरुणांना ‘मधुर क्रांती’ या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्याचे ठरविलेले आहे. हा निवासी निःशुल्क असा कार्यक्रम आहे.

## ५) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) : शिक्षक

राज्यस्तरीय बैठकीमधी ठरल्याप्रमाणे करिअर संसदेचे राज्यस्तरीय अधिवेशन ३ जानेवारी ते ७ जानेवारी या कालावधीमध्ये बारामती येथे पाच दिवसांसाठी आयोजित करण्याचे नियोजित असून. यामध्ये विद्यार्थ्यांसोबत आलेल्या प्राध्यापक वर्ग यांच्याकरिता निवासी पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम हा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या सध्य स्थितीत प्रचलित आणि आवश्यक विषयावर घेण्याचे नियोजित आहे. सदर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम हा निःशुल्क प्रकारचा असून सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा.

★ ★ ★